## -: सुधारित उपविधी :-

## जिल्हा मजूर सहकारी संघ

सूचना-या उपविधीत केलेला अधिनियमांचा व नियमांचा उल्लेख हा अनुक्रम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 व त्या अन्वये केलेले नियम, 1961 यांचा आहे असे समजावे

**1.** जिल्हा संघाचे

नांव.............................................................................................

व तिचा नोंदणी क्र................................................दि......................असा आहे.

**2.** जिल्हा संघाचा नोंदविलेला

पत्ता.......................................................................................................................

.....................................................................असा आहे.

संस्थेच्या पत्त्यातील होणारा बदल अधिनियमातील कलम 37 व नियम 31 मधील तरतूदींनूसार निबंधकांना कळविला जाईल व निबंधकाच्या मंजूरीनंतरच तो बदल नोंदविला आहे असे समजण्यांत येईल व तो संबंधितांना तीस (30) दिवसांचे आंत कळविला जाईल.

**3.** संस्थेचे वर्गीकरण “उत्पादक संस्था” व उपवर्गीकरण “ कामगारांच्या औद्योगिक संस्था” असे राहील.

**4.** संस्थेचे आर्थिक वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

**5.** संस्थेचे कामकाज तिचे पोटनियम, अधिनियम व नियम यांचे योग्य पालन करुन केले जाते किंवा कसे, कागदपत्रे आणि हिशोब पुस्तके योग्य नमुन्यात ठेवली आहेत काय, संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्वावर चालतो का, संस्था सहकारी तत्वांचे आणि अधिनियमांच्या तरतूदीनूसार आणि त्या अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमानुसार राज्य सरकारने दिलेल्या निर्देशक तत्वांचे किंवा आदेशांचे पालन करत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी निबंधकाने अगर त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने संस्थेच्या कामकाजाची तपासणी करणे हे कायदेशीर असेल.

**6.** संस्थेचे कार्यक्षेत्र.........................................................................असे राहील.

**7.** संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे असतील.

1. जिल्हा फेडरेशन मार्फत मजूर सहकारी संस्थांना तांत्रिक व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करुन देणे/ मार्गदर्शन करणे.
2. मजूर संस्थांचेकरिता किफायतशीर दरानेमशिनरी मिळवून देणे तसेच खडी, दगड,चुना वीट इ. उत्पादनाकरिता सहाय करणे व मदत करणे.
3. मजूर संस्थांची अंतर्गत व्यवस्था सुधारणेकरिता व प्रगतीवर राहणे करिता जिल्हा फेडरेशन मार्फत हिशेब, देखरेख, परिक्षण, प्रचार इ. बाबत मार्गदर्शन, नियंत्रण ठेवणे त्याचप्रमाणे मजूर संस्थांना आवश्यक त्या तांत्रिक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे.
4. मजूर संस्थांचे जिल्हा पातळवरील प्रत्यक्ष कामकाजातील अडचणी दूर करणेकरिता राज्य मजूर संघाच्या समन्वयाने / मार्गदर्शनानूसार प्रयत्न करणे.
5. मजूर सहकारी संस्थांना पुरेसा पत पुरवठा होणेकरिता प्रयत्न करणे.
6. काम देणा-या खात्याकडील चालू दर ठरविणेबाबत शासनाच्या निरनिराळया खात्यांशी संपर्क साधून योग्य ते दर ठरविण्यास सहायभूत होणे व त्याबद्दल प्रयत्नशिल रहाणे.

7.मजूर सहकारी संस्थांची सर्वागीण उन्नती होणेकरिता अद्यावत व आदर्श योजना ठरविणे व त्या राबविणेस सहकार्य करणे.

8. मजूर संस्थांना उपयुक्त होईल अशी माहिती जमविणे व ती प्रसिध्द करणे व पुरविणे.

9. मजूर संस्थांच्या कामकाजातून त्यासंबंधी निर्माण होणा-या प्रश्नांवर अथवा सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर योग्य ती कारवाई करणेस मदत करणे.

10. मजूर संस्थांच्या गरजा लक्षात घेवून त्यांना कच्चा माल, बांधकाम साहित्य मिळवून देणेस मदत करणे.

11. काम देणा-या खात्याकडील सर्व कामे जिल्हा फेडरेशनकडूनच वाटप केली जाऊन वेळेत पूर्ण होतात किंवा नाही याकडे लक्ष ठेवून ती पूर्ण करुन घेणे.

12. सभासदांना लागणारी यंत्रसामुग्री व तिचे सुटे भाग आणि इतर कच्चा माल पुरविणेस योग्य ते सहाय करणे.

13. वरील उद्देशात काहिहि नमूद केले असले तरी, मजूर सहकारी संस्थांचे कार्य प्रगतीवर रहाणेकरिता जे जे करता येण्यासारखे आहे ते वेळोवेळी करणे.

14. संस्थेच्या सभासदांना, संचालकांना, तसेच कर्मचा-यांना सहकार प्रशिक्षण देणे व त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करणे.

**8.** खालील साधनांनी संस्थेसाठी भांडवल जमा केले जाईल.

1-भागरुपाने (अ) सभासदांकडून (ब) शासनाकडून किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केमार्फत अगर वित्तीय संस्थांमार्फत.

2-सभासदांकडून ठेवी घेऊन.

3-कर्ज रुपाने

4-देणग्या व मदत घेऊन.

5-प्रवेश फी आकारुन.

वरील 2,3 व 4 या साधनांनी जमविण्यांत येणारे भांडवल हे निबंधकाचे पुर्वपरवानगी शिवाय वसूल झालेले भागभांडवल, संचित राखीव निधी व इमारत निधी यांच्या बेरजेतून साचलेले तोटे वजा जाता राहिलेल्या रक्कमेच्या दहा पटीहून अधिक असणार नाही. संस्थेचे भांडवल तिच्या व सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याकरिता उपयोगात आणले जाईल. संस्थेचे भांडवल संस्थेच्या व्यवहारात गुंतविलेले नसेल तेव्हा अधिनियम कलम 70 अन्वये ते गुंतविले जाईल.

**9.** खालील अटींना पात्र राहून संघाच्या कार्यक्षेत्रात असणा-या कोणत्याही मजूर संस्थेस सभासद होता येईल.

1. मजूर सहकारी संस्थेची पत चांगली असली पाहिजे.

2. मजूर सहकारी संस्थेने खरी वार्षिक हिशोबीपत्रके दिली पाहिजेत.

3. संघाचे उद्देश मजूर संस्थेस समजले पाहिजेत.

4. मजूर संस्थेचा सभासद होण्याबद्दलचा लेखी अर्ज संचालक मंडळातील हजर असणा-या एकूण संचालकांच्या बहुमताने मंजूर केलेला असला पाहिजे.

5. मजूर संस्थेने रु. 100/- प्रवेश फी दिली पाहिजे.

6. मजूर संस्थेने किमान एक तरी भाग घेवून त्याची पूर्ण रक्कम भरलेली असली पाहिजे.

7. अधिनियम, नियम व उपविधी यातील अटी त्याने पूर्ण केलेल्या असल्या पाहिजेत.

8. सारखेच उद्देश असलेल्या दुस-या सहकारी संघाचा सभासद नसला पाहिजे.

9. कोणतीही संस्था कार्यक्षेत्रात राहते किंवा नाही अथवा ती संस्था पात्रता धारण करते किंवा नाही या विषयी कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास कलम 11 अन्वये संबंधित निबंधकास निर्णय देणेचा अधिकार राहील.

10.अधिनियमातील कलम 33 व 105 मधील तरतुदींना आधीन राहून सभासदाची जबाबदारी मजूर संस्थेने घेतलेल्या भागांच्या प्रमाणात राहील.

11. कोणत्याही सभासद संस्थेस एक महिन्याची लेखी नोटीस देवून राजीनामा देता येईल मात्र त्यापुर्वी सभासद मजूर संस्थेकडे येणे असलेल्या रक्कमांची वसूली झाली असली पाहीजे तसेच नियम 21 मधील व उपविधीतील तरतूदी राजीनामा मंजूर करतांना विचारात घेतल्या जातील.

12. सर्वसाधारण सभेत हजर असणा-या व मताचा अधिकार असणा-या सभासद संख्येच्या तीन चतुर्थांश सभासदांच्या मतांनी कोणत्याही सभासद संस्थेस पुढीलपैकी कोणत्याही कारणास्तव काढून टाकता येईल.

1. जर सभासद संस्था उपविधी क्र. 9 मधील अटी पाळीत नसेल.
2. जर संचालक मंडळाच्या मते संघाच्या हिताविरुध्द सभासद संस्था कृत्ये करीत असेल अगर संघाचे कामकाजात अडथळे आणीत असेल.
3. जर संचालक मंडळाच्या मते सभासद संस्थेने संघास बदनाम केले असेल.
4. जर सभासद संस्थेचे दिवाळे निघाले असेल अगर ती कायद्याने लायक ठरत नसेल.
5. जर सभासद संस्था काळया यादीत असेल.
6. सभासद संस्थेने सभासदत्वाचा दिलेला राजीनाम मंजूर झाल्यास
7. सभासद संस्थेच्या नांवावरील सर्व भाग अगर हितसंबंध दुस-याच्या नांवावर वर्ग झाल्यास

**13.** कोणत्याही सभासद संस्थेस काढून टाकतांना अधिनियम कलम 35 व नियमामधील तरतुदी विचारात घेतल्या जातील व त्यात नमूद केलेल्या कार्यरीतीचा अवलंब केला जाईल. काढून टाकलेल्या सभासद संस्थेस या तरतुदीनुसार पुन्हा एक वर्षानंतर सभासद करुन घेता येईल.

**14.** प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. 1000/- राहील. एकूण भाग भांडवलाची कमाल मर्यादा रु................ राहील. तसेच एकूण भागांची संख्या...........................राहील.

**15.** जिल्हा संघाच्या एकूण भागांच्या एकपंचमांश भागापेक्षा जास्त किंमतीचे भाग कोणत्याही सभासद संस्थेस धारण करता येणार नाहीत अगर त्यावर हक्क सांगता येणार नाही.

**16.** जादा भागाकरिता केलेले अर्ज लेखी असले पाहिजेत व संचालक मंडळाकडून अशा अर्जाचा निकाल केला जाईल.

**17.** प्रत्येक मजूर सहकारी संस्थेने केलेल्या कामाच्या 1 % वर्गणी सुपरव्हीजन फी म्हणून जिल्हा मजूर संघास द्यावयाची आहे. यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार वार्षिक सर्वसाधारण/ विशेष साधारण सभेस राहील.

**18.** जिल्हा मजूर संघाच्या अधिमंडळ बैठकीकडे संस्थेची सर्वोच्च सत्ता राहील, पण ती सत्ता अधिनियम, नियम, उपविधी यांतील तरतूदींना अधिन राहील.

**19.** संस्थेची पहिली सर्वसाधारण बैठक नियम 59 मधील तरतूदीनुसार भरविली जाईल व त्या सभेत त्याच तरतूदीनुसार कामे केली जातील.

**20.** दरवर्षी आर्थिक वर्ष संपलेनंतर सहा महिन्याच्या आंत (30 सप्टेंबर पूर्वी) अधिनियम 75 व नियम 60 मधील तरतूदींनुसार अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावली जाईल.

**21.** अधिमंडळाची वार्षिक बैठकीत करावयाच्या कामात खालील कामांचा समावेश होतो.

1. जिल्हा मजूर संघाचा गतवर्षीचा अधिनियम कलम 75 मधील तरतुदीनुसार तयार केलेला वार्षिक अहवाल व नियमामधील तरतूदीनुसार त्या वर्षाची एन नमुन्यात तयार केलेली आर्थिकपत्रके स्वीकारणे व ती नफयाच्या विभागणीसह मंजूर करणे अगर त्यात जरुर वाटतील त्या दुरुस्त्या करुन त्याला मंजूरी देणे.
2. उपविधीमधील मर्यादेस अधीन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे.
3. अहवाल वर्षापाठीमागील वर्षाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
4. अहवाल वर्षातील वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
5. चालू आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनमान्य तालिकेवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे. मात्र अशा त्याच लेखापरिक्षकाची नियुक्ती सलग कमाल तीन वर्षासाठीच करता येईल.
6. निबंधकास सादर केलेल्या / करावयाच्या वार्षिक विवरण पत्रकांची नोंद घेणे.
7. जिल्हा मजूर संघाच्या होणा-या / व्हावयाच्या पंचवार्षिक निवडणूक तारखेची नोंद घेणे.
8. सभासदांच्या अंतर्गत तक्रारी अथवा वाद निवारण करणेसाठी तीन ज्येष्ठ व अनुभवी सभासदांची तक्रार निवारण समिती नियुक्त करील. मात्र अशा समितीचे सदस्य म्हणून विद्यमान संचालक मंडळापैकी कोणाचीही नियुक्ती करता येणार नाही.
9. उपविधीनुसार सभासद मजूर संस्थांचे सभासदत्व रद्द करणे.
10. जिल्हा संघाच्या उपविधीमध्ये आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करणे.
11. उपरोक्त उद्देशांमध्ये काहीही असले तरी सभासद मजूर सहकारी संस्थांच्या प्रगतीकरिता आवश्यक ती उपाययोजना जिल्हा मजूर संघ करेल.

**22.** कामकाजाच्या आवश्यकतेनूसार उपसमितीचे गठण करणे.
उदा. कामवाटप, बांधकाम, कर्मचारी, वर्गणी, कर्जप्रकरणे इ. करिता उपसमिती नेमता येईल मात्र अशा उपसमितीचे अधिकारपरत्वे (एक्स ऑफिशिओ) सभासद असतील

**23.** कलम 76 मधील तरतूदीनुसार संस्थेला अधिमंडळाची विशेष बैठक बोलाविता येईल व त्याच तरतूदीनुसार ती बोलावली जाईल व खालील परिस्थितीत ती एक महिन्यात बोलाविलीच पाहिजे.

1. संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या एक पंचमांश सभासदांनी लेखी मागणी केल्यास
2. निबंधकाने तशी सूचना केल्यास.
3. संघीय संस्थेच्या समितीने तशी सूचना केल्यास.

**24.** सर्वसाधारण बैठकीची कार्यपध्दती नियम 60 मधील तरतुदीनुसार राहील.

**25.** अधिमंडळाची वार्षिक बैठकीसाठी चौदा दिवसांची व विशेष बैठकीसाठी सात दिवसांची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या व्यवस्थापकाने ती सभा बोलाविली पाहिजे. अशा सभेची सूचना निबंधकांना दिली पाहिजे. नोटिशीत सभेची तारीख व निश्चित वेळ नमूद केली पाहिजे. पोस्टाने / रजिस्ट्रर पोस्टाने पाठविलेल्या / हस्ते दिलेल्या नोटीशीची पोहोच असावी. संस्थेचा अध्यक्ष व त्याचे गैरहजरीत संचालक मंडळातीलएक संचालक व व्यवस्थापक यांनी नोटिशीवर सहया केल्या पाहिजेत.

**26.** कोणत्याही सर्वसाधारण बैठकीत एकूण सभासद संख्येच्या दोन पंचमांश अगर 25 (यापैकी जी संख्या कमी असेल तितके ) सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजले जाईल. सभेस गणपूर्ती झाली नसेल तर, ती सभा सात दिवसांपर्यन्त पुढे ढकलली जाईल. मात्र अशा सभेस गणपूर्ती असो वा नसो, सभेचे कामकाज पुर्ण केले जाईल. परंतु त्या सभेत विषय पत्रीकेतील सर्व विषय न संपल्यास त्या सभेच्या तारखेपासून पुढे 30 दिवसांच्या आंत पुन्हा सभा घेवून उर्वरीत विषयांचे कामकाज पुर्ण करणेत येईल.

**27.** संस्थेचे अध्यक्ष हे अधिमंडळ बैठकीचे अध्यक्ष असतील. त्यांच्या गैरहजरीत सभेसाठी अध्यक्षाची निवड सर्वसाधारण सभा करेल.

**28.** कलम 27 व नियम 60 मधील तरतूदीनुसार अधिमंडळ बैठकीत मतदान केले जाईल. सभेस हजर असणा-या प्रत्येक सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार राहील. **परंतु थकबाकीदार व क्रियाशील नसलेल्या सभासदांस मतदानाचा अधिकार असणार नाही.** अध्यक्षास इतर पात्र सभासदाप्रमाणे एक मत असेल. परंतु एखाद्या ठरावावर मतदान सारखेच विभागले गेल्यास मात्र अध्यक्षास जादा एक निर्णायक मत असेल. एखाद्या ठरावावर (मतैक्य न झाल्याने) सभासद विभागले गेले असतील तेव्हा, मतदान करणा-या कोणाही सभासदास मतदान (पोल) करण्याची मागणी करता येईल. त्यानंतर अध्यक्षाने ती मंजूर केली पाहिजे.

क्रियाशील सभासद म्हणजे ज्या सभासद संस्थेने मागील सलग पाच वर्षात किमान एका अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत उपस्थिती व मागील सलग पाच वर्षातील केलेल्या कामांपोटी 1 % वर्गणी जिल्हा मजूर सहकारी संघास वार्षिक हिशोबासहित दिली असली पाहिजे.

**अशा क्रियाशील सभासदांची नोंद संस्थेने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी सूचित केलेल्या विहित नमून्यात ठेवावयाची आहे.**

**केवळ क्रियाशील सभासदासच संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीमध्ये मतदानाचा अधिकार राहिल.(कलम 27) तसेच क्रियाशील सभासदच संस्थेचा संचालक म्हणुन निवडून येण्यास पात्र राहिल. उपरोक्त प्रमाणे क्रियाशील सभासदत्वाच्या अटी पूर्ण न करणारे सभासदाचे नावे अक्रियाशील सभासद नोदंवहीत राहील.संस्थेने सभासदांचे अक्रियाशील सभासद असे वर्गीकरण केल्यास त्यास आर्थिक वर्ष संपल्याचे दिनांकापासून 30 दिवसात कळविले पाहिजे. तथापि क्रियाशील व अक्रियाशील सभासदांचे**

**वर्गीकरणा बाबत वाद उदभवल्यास असे वर्गीकरण केल्याचे दिनांकापासून 60 दिवसाचे आत निबंधकाकडे अपिल करता येईल.**

**थकबाकीदार सभासदास मतदानाचा अधिकार राहाणार नाही.**

**29.** कोणत्याही पास झालेल्या ठरावात बदल करण्यासंबंधीचा ठराव अधिमंडळ बैठकीत पास झालेल्या मूळ ठरावाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत निबंधकाच्या परवानगीशिवाय कोणत्याही अधिमंडळ बैठकीत आणता येणार नाही.

**30.** जिल्हा मजूर संघांनी खाली दिलेल्या संस्थांना सामील होऊन कायदा-नियम व संबंधित संस्थांचे उपविधीस अनुसरुन संस्थेने त्यांचे सभासदत्व स्विकारले पाहिजे.

1. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्क
2. राज्य मजूर सहकारी संघ

जिल्हा संघ ज्या इतर संस्थांची सभासद झाली असेल अशा संस्थांच्या अधिमंडळ बैठकींना संस्थेतर्फे प्रतिनिधीला हजर राहता येईल. अधिनियम कलम 27 मधील तरतुदींना अधीन राहून संघ वेळोवेळी प्रतिनिधी ठरवील.

**31.** कार्यकारी संचालक / व्यवस्थापकाने अधिमंडळ बैठकीचा वृत्तांत नोंदवहीत लिहून ठेवला पाहिजे.

**32.** **1.** जिल्हा मजूर संघाच्या संचालक मंडळाने संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात 15 संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे पाच वर्षे इतका राहील. तसेच जिल्हा मजूर संघाच्या पदाधिका-यांचा कालावधी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कालावधी इतका राहील.

संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| 1- सर्वसाधारण | -10 |
| 2- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती | -1 |
| 3- विमुक्त जाती भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग | -1 |
| 4- इतर मागासवर्गीय | -1 |
| 5- महिला | -2 |
| एकूण | - 15 |

वरील संचालक पदे संस्थेच्या सर्व क्रियाशील सभासदांद्वारे निवडणूकीद्वारे भरली जातील. जिल्हा संघाच्या संचालक मंडळाची निवडणूक ही राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येईल.

2- तज्ञ संचालक -2 प्रतिनिधी

तज्ञ संचालक म्हणजे कामगार कायदा विषयक / बांधकाम विषयक व संस्थेचे उद्देश व कार्यपध्दती संबंधीच्या विषयातील तज्ञ असणा-या व्यक्ती होय.

अ- नियुक्ती - संचालक मंडळ त्यांना नियुक्त करेल.

ब- मतदानाचा अधिकार - कोणत्याही निवडणुकीत त्यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही. मात्र संस्थेच्या व्यवसायाच्या अनुषंगाने कामकाजातील निर्णय प्रक्रियेत मतदान करु शकतील व त्यांचे अभिप्राय सादर करु शकतील.

क- गणपुर्ती- गणपुर्तीसाठी त्यांची उपस्थिती ग्राहय धरली जाणार नाही.

4- कार्यलक्षी संचालक - 1 प्रतिनिधी

संघाचे व्यवस्थापक हे एक कार्यकारी संचालक असतील. कार्यकारी संचालकांना मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही व गणपुर्तीसाठी उपस्थिती ग्राहय धरली जाणार नाही.

**33.** संचालक मंडळात रिक्त होणा-या जागा कायद्यातील तरतुदीप्रमाणे भरता येतील.

**34.** योग्य कारण दाखविल्यावाचून संचालक मंडळाच्या लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिल्यास असा संचालक, संचालक मंडळातून कमी करण्यात येईल. तथापि कमी करण्यापूर्वी त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल.

**35.** संचालक मंडळाची गणपूर्ती होण्यास जिल्हा संघाच्या संचालक मंडळाच्या एकूण सदस्य संख्येच्या 50 % पेक्षा अधिक एक सदस्य संख्या आवश्यक राहील. अशा प्रकारे गणपूर्ती झाल्यानंतर सभेचे कामकाज करता येईल. कार्यकारी संचालक व तज्ञ संचालकांची गणपूर्तीसाठी गणना केली जाणार नाही.

**36.** जिल्हा संघाच्या कोणत्याही पदाधिका-याविरुध्द अविश्वास ठराव हा अधिनियमातील कलम 73 (एक)(डी) नुसार आणता येईल. अशा पदाधिका-यांस विहीत पध्दती अनुसरुन पदावरुन दूर केल्यास ते पद रिक्त होईल व त्याच्या जागी पदाधिका-याची फेरनिवड करण्यांत येईल.

**37.** ज्या संचालकाने जिल्हा संघाकडून अनामत अगर अग्रीम रक्कम घेतली असेल अशा संचालकांना संघाने नोटीसद्वारे मागणी केल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत रक्कम भरली नाही अगर (1) संघाकडून त्याला मागणीची नोटीस मिळाल्यापासून अथवा (2) त्याने अनामत / अग्रीम रक्कम घेतल्यापासून तीस दिवसांच्या आंत यापैकी जी कमी मुदत असेल तो पर्यन्त भरली नाही तर त्या दिवसापासून तो संचालक म्हणून कमी झाला व त्याची जागा रिक्त झाली असे समजण्यात येईल.

**38.** जर एखादा संचालक अधिनियमान्वये किंवा त्याखालील नियमान्वये कोणत्याही प्रकारे अपात्र ठरला असल्यास तो संचालक म्हणून निवडून येण्यास, स्विकृत (को-ऑप्ट) करण्यास किंवा संचालक म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल.

**39.** अधिनियमातील कलम 73 गक तरतूदीप्रमाणे संचालक अपात्र ठरल्यास संचालक मंडळावर संचालक म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.

**40.** एखाद्या संचालकाच्या त्यांच्या संस्थेत असणा-या हितसंबंधाविषयी बाबींचा विचार चालू असतांना संचालक मंडळाच्या त्या सभेत त्यास हजर राहता येईल परंतु त्यास मतदान करता येणार नाही.

**41.** संचालक मंडळ सभेची नोटीस ही कमीत कमी पूर्ण 7 दिवसांची असली पाहिजे व व्यवस्थापकाने सदरची नोटीस रजिस्ट्रर पोस्टाने सर्व संचालकांना पाठविली पाहिजे. अशा सभा अध्यक्षाच्या सूचनांनूसार व्यवस्थापकाने बोलाविल्या पाहिजेत. इतर संचालकांनी मागणी करुनही संचालक मंडळाची सभा बोलवण्याच्या कामी अध्यक्षांकडून टाळाटाळ होत असेल तर सभा बोलाविण्यासाठी संचालकांनी बहुमताने दिलेली लेखी मागणी व्यवस्थापकावर बंधनकारक राहील.

**42.** संचालक मंडळ सभेस संस्थेचे अध्यक्ष हेच अध्यक्ष म्हणून राहतील. अध्यक्ष गैरहजर असतील तेव्हा सभेस हजर असलेल्या संचालकांनी आपल्यापैकी एका संचालकास त्या सभेकरिता अध्यक्ष म्हणून निवडले पाहिजे. अध्यक्षाला संचालक या नात्याने असलेल्या एका मताखेरीज समान मत प्रसंगी निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल. मात्र सदर निर्णायक मताचा हक्क पदाधिकारी निवडीचे प्रसंगी राहणार नाही.

**43.** वर्षभरात संस्थेच्या कामाकरिता संचालक मंडळाच्या आवश्यक तितक्या सभा भरविल्या जातील परंतु दरमहा निदान एक तरी सभा भरलीच पाहिजे. व्यवस्थापकाने सभांचा वृत्तांत नोंदवहीत लिहून ठेवला पाहिजे.

**44.** संचालक मंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील.

1- सभासद मजूर सहकारी संस्थांना जिल्हयातील विविध शासकिय, निमशासकिय, महामंडळे इ. मार्फत कामे मिळवून देणेबाबत प्रयत्नशिल राहणे.

2- मजूर सहकारी संस्थांना मिळणा-या कामांच्या पूर्ततेबाबत देखभाल करणे.

3- मजूर सहकारी संस्थांना प्रशासकीय मदत करणे.

4- सभासद होण्यासाठी व भागांसाठी आलेल्या अर्जाचा निकाल करणे.

5- संस्थेच्या कामासंबंधी होणारा खर्च मंजूर करणे.

6- हिशोब वेळच्या वेळी व्यवस्थापनाकडून लिहून घेणे व ते तपासणे व रोख शिल्लक मोजून पाहणे.

7- कलम 75 व त्याखालील नियमानुसार वार्षिक अहवाल व ताळेबंद पत्रके वर्ष संपल्यावर 45 दिवसांत तयार करणे.

8- गरजेनूसार उपसमित्या नेमणे.

9- व्यवस्थापक यांचेखेरीज प्रशासनातील इतर पगारी अधिका-यांच्या व सेवकांच्या नेमणूका करणे, त्यांच्या पगाराची व भत्त्यांची श्रेणी (स्केल) व रक्कम ठरविणे अगर त्यात बदल करणे, त्यांना ताकीद देणे अगर दंड करणे वा त्यांना तात्पुरते अगर कायमचे कामावरुन दूर करणे व या सर्वबाबतीत नियम तयार करणे व ते सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस ठेवणे. सर्व कर्मचा-यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

10- कायदेशीर कामे चालविणे अगर अशी कामे चालविण्यासाठी पदाधिकारी, संचालक अगर अधिकारी यांना अधिकार देणे.

11- आपल्या संघाच्या आणि सभासदांच्या गरजा अजमावून धंद्यासाठी अगर कामांसाठी लागणारा माल खरेदी करण्याची तजवीज करणे व जरुर पडल्यास मागणी करणा-या सभासदांच्या खर्चाने व त्याच्या जोखमीवर तो साठविण्याची, वाटण्याची व विकण्याची तजवीज करणे.

12- संघाची मालमत्तेचे नोंदबूक तपासणे व शिल्लक माल बरोबर आहे किंवा नाही ते पाहणे.

13- संघ वापरीत असलेली यंत्रसामुग्री इत्यादी वस्तू तपासणे.

14- संघाच्या कार्यालयासाठी, कामकाजासाठी जागा संपादन करणे अगर भाडयाने घेणे/देणे.

15- संघाच्या स्थावर मालमत्तेच्या सुरक्षेकरिता आवश्यक ती उपाययोजना करणे.

16- ज्या व्यवस्थापक व इतर सेवकांचा रोकडीशी, महत्वाच्या कागदपत्रांशी अगर रोख्यांशी संबंध येत असेल अशांकडून योग्य रकमेचा प्रमाणानुसार जामीन रोखा घेणे.

17- अधिनियम कलम 82 व नियम 73 मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण दोष दुरुस्ती “ओ“ निबंधकाकडे पाठवणे आणि लेखापरिक्षण दुरुस्ती अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

18- सर्वसाधारणपणे संस्थेचा व्यवहार चालविणे.

19- सेवकवर्ग, सभासद व बिगर सभासद संस्थांना द्यावयाच्या सेवेबाबत निर्णय घेणे.

20- सभासद व बिगर सभासद मजूर संस्थांना कामाच्या योग्य त्या पूर्ततेबाबत मदत करणे.

21- संचालक मंडळ दरवर्षी आर्थिक वर्ष समाप्तीनंतर सहा महिन्यांचे आंत (30 सप्टेंबर) त्या आर्थिक वर्षाची खालील विवरणपत्रके निबंधकाकडे दाखल करतील. तसेच ही विवरणपत्रके संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे ठेवतील.

1- संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाची माहिती देणारा वार्षिक अहवाल.

2- अहवाल वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल

3- नफा वाटणी विनियोजन.

4- उपविधी दुरुस्तीबाबतची यादी (असलेस)

5- अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची तारीख व संस्थेच्या निवडणूकीची तारीख.

6- अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत नियुक्त केलेल्या वैधनिक लेखापरिक्षकाची माहिती व त्याचे संमतीपत्र

7- कायद्यातील तरतुदीनुसार निबंधकास आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही माहिती.

**45.** व्यवस्थापकाची नेमणूक संचालक मंडळ करेल.

**46.** अधिनियम व नियमातील तरतुदीप्रमाणे संघाच्या एखाद्या करारात किंवा व्यवहारात खरेदी केलेल्या अगर विकलेल्या मिळकतीत व्यवस्थापकास कसलाही भाग अगर हितसंबंध ठेवता येणार नाही.

**47.** व्यवस्थापकाची कामे पुढीलप्रमाणे असतील.

1. संघाच्या अधिमंडळाची बैठक व संचालक मंडळाच्या सभा बोलाविणे.
2. अशा सभात होणारी कामांची नोंद, नोंदवहीत करणे.
3. संचालक मंडळाच्या हुकुमाने पैसे खर्च करणे.
4. अधिनियम व नियमातील नमूद केलेल्या व संस्थेने ठरविलेल्या सर्व नोंदवहया व हिशोब पुस्तके वेळच्यावेळी लिहून अद्ययावत ठेवणे.
5. जमा पावत्या, खर्चाच्या पावत्या (व्हौचर्स) व संस्थेचे काम चालविण्यासाठी सर्व कागदपत्रे तयार करणे.
6. अधिनियम व नियमाप्रमाणे आर्थिकपत्रके ठरलेल्या मुदतीच्या आत तयार करुन संचालक मंडळापुढे ठेवणे व अधिमंडळाच्या बैठकीत नेमलेल्या लेखापरीक्षकांकडे पाठविण्याची व्यवस्था करणे.
7. संघाचा पत्रव्यवहार चालविणे व सदस्यांना लागणारी जरुर ती माहिती वेळोवेळी पुरविणे.
8. लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ताबडतोब तो विचाराकरिता संचालक मंडळापुढे ठेवणे व दाखविलेले दोष व चुका दुरुस्त करण्याबाबत जरुर ती तजवीज करणे व नियमाप्रमाणे दोषदुरुस्ती संचालक मंडळापुढे ठेवून पुढे पाठविण्याची व्यवस्था करणे.
9. संघाच्या पगारी सेवकांना काम नेमून देणे, त्यांच्यावर देखरेख ठेवणे व त्यांचे नियत्रंण करणे.
10. व्यवस्थापकाच्या गैरहजरीत तात्पुरती कामे करण्यासाठी दुस-या सेवकांस अथवा संचालक मंडळातील एखाद्या संचालकास अधिकार देता येईल.
11. संघाच्या क्रियाशील सभासदांची यादी अद्ययावत ठेवणे व ती प्रसिध्द करणे.
12. संघ सभासद, संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी यांना कलम 24 क नुसार सहकार प्रशिक्षण देणेची व्यवस्था करणे.

**48.** जिल्हा संघ तिच्या सेवकांकरीता आवश्यकतेप्रमाणे भविष्यनिर्वाह निधी अधिनियम 71 व नियमानुसार निर्माण करेल.

**49.** जिल्हा मजूर संघाची व प्राथमिक मजूर संस्थांची जबाबदारी पुढीलप्रमाणे.

1- सहकार कायदा व नियमानूसार तसेच सहकार विभागाकडील आदेशांनूसार मजूर सभासदांकरिता योग्य ती कार्यवाही जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांनी करणे त्याबाबत जिल्हा मजूर संघानी देखरेख करणे.

2- प्राथमिक मजूर संस्थांनी केलेल्या कामाच्या रक्कमेपैकी 1 % वर्गणी जिल्हा मजूर संघास दयावी व ती वसूल होणेकरिता जिल्हा संघाने आवश्यक ते उपाय / कार्यवाही करणे.

3- जिल्हा मजूर संघाने “महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ” याचे सभासद झाले पाहिजे. व त्यासाठी जिल्हा मजूर सहकारी संघास प्राथमिक मजूर संस्थांकडून प्राप्त होणा-या 1 % वर्गणीपैकी 10 % वर्गणी राज्य मजूर संघास दिली पाहिजे.

4- कायदा व नियम यांच्या तरतूदीस अधिन राहून सभासद संस्था, संचालक यांचेकरिता प्रशिक्षणाची सोय करणे. संघ, महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा राज्य संघीय संस्थेमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेमार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करेल आणि सदर प्रशिक्षणकरिता शासनाने ठरविलेल्या दराने निधी जमा करेल.

**50.** जिल्हा संघ प्रत्येक वर्षअखेरीस हिशोब तयार झाल्यावर संघाच्या ढोबळ नफयातून कलम 65 व नियम 51 मधील तरतुदीनुसार निरनिराळया खर्चाच्या वगैरे रक्कमा, कलम 71 प्रमाणे सेवक निधीसाठी संघाने दिलेली अंशदाने, डेडस्टॉक, यंत्रे, इमारती इत्यादी बाबतच्या टिकाऊपणा विचारात घेवून त्यांच्या किंमतीवर आकारलेली झीज व तोटयाच्या रक्कमा वजा करुन संस्थेच्या निव्वळ नफयाचा आकडा काढला जाईल व तो नफा पुढील अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत जाहीर केला जाईल.

**51.** कलम 64 ते 69 व नियमांमधील तरतूदींना अधीन राहून निव्वळ नफयाची विभागणी पुढील बाबींवर केली जाईल.

1- कमीत कमी 25 % रक्कम राखीव निधीसाठी.

2- जास्तीत जास्त 15 % दराने लाभांश वाटण्याकरिता.

3- नफयाच्या 20 % उर्वरित शिल्लक मर्यादा पर्यन्त कलम 69 प्रमाणे सार्वजनिक व धर्मादाय अशा प्रकारच्या कामाकरिता.

4- शिल्ल्क नफा हा कायदा व नियम यांच्या तरतूदीस अधिन राहून अधिमंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरीने.

**52.** निबंधकाच्या पूर्वपरवानगीने अधिनियम व नियम यांतील तरतुदींना अधीन राहून अधिमंडळाच्या बैठकीस वरील नफा वाटणीच्या प्रमाणात बदल करता येईल.

**53.** संघात जमा होणारी प्रवेश फी, दंड रक्कम, आदी रक्कमा राखीव निधित जमा केली जाईल.

**54.** संस्थेने तिची गुंतवणूक ही कलम 70 नुसार केली पाहिजे.

**55.** संघाची रु................पर्यन्तची शिल्लक व्यवस्थापकाकडे ठेवता येईल. त्यापेक्षा जास्त शिल्लक जमली असल्यास ती जमल्यापासून तीन दिवसांच्या आंत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) ती बॅन्क खात्यात भरली पाहिजे व ती भरण्याची जबाबदारी व्यवस्थापक व अध्यक्षावर राहील.

**56.** संघाचे रोखे, संघाच्या हिशोबाची पुस्तके व कागदपत्रे व्यवस्थापकाच्या ताब्यात राहतील व ती सांभाळण्याची जबाबदारी व्यवस्थापकावर राहील.

**57.** नियमामध्ये नमूद केलेली व निबंधकांनी ठरविलेली व संचालक मंडळास आवश्यक वाटतील अशी हिशोबाची पुस्तके व कागदपत्रे संस्थेने ठेवली पाहिजेत. त्या पुस्तकांवर व कागदपत्रांवर जरुर तेथे व कीर्दीवर दररोजच्या व्यवहाराच्या शेवटी अध्यक्ष व व्यवस्थापकाने सहया केल्या पाहिजेत. या व्यतिरिक्त दुस-या अधिका-यांनी कागदपत्रांवर सहया करावयाच्या असल्यास त्यांना त्या करण्यासाठी संघास अधिकार देता येईल.

**58.** संघात आलेल्या ठेवीच्या, कर्ज फेडीच्या व रक्कमांच्या ठराविक नमुन्यातील जमेच्या पावत्या सहया करुन दिल्या पाहिजेत.

**59.** सभासद मजूर सहकारी संस्थेच्या कामकाजाबाबत तसेच वार्षिक माहिती प्राप्त करणेबाबत जिल्हा संघाने कार्यवाही करणे व त्याबाबत व्यवस्थापकाने स्वत:चा अभिप्राय संचालक मंडळास देणे.

**60.** संघाच्या कोणत्याही सभासदाला अधिनियम कलम 32 मधील तरतुदीनुसार व त्यात नमूद केलेली संस्थेची पुस्तके पाहता येतील. अगर नियम 27 मधील तरतुदीनुसार त्याच्या नक्कला त्यास देता येतील.

**61.** संघाच्या उपविधीत बदल करणे, एखादा उपविधी रद्द करणे किंवा नवीन उपविधी करावयाचा असल्यास कलम 13 व नियम 12 मधील तरतुदी अनुसरल्या जातील. त्याकरिता भरलेल्या सर्वसाधारण सभेत हजर असणा-या व मत देणा-या सभासदांच्या निदान दोन तृतियांश संख्येने त्या बदलासंबंधीचा ठराव पास केला पाहिजे. त्या सभेची नोटीस सभेच्या तारखेपूर्वी निदान चौदा दिवस अगोदर सर्व सभासदांना दिली पाहिजे. कोणता उपविधी कसा बदलावयाचा, कोणता नवीन स्वीकारावयाचा अगर रद्द करावयाचा हे त्या नोटीशीत स्पष्टपणे लिहिजे पाहिजे. निबंधक यांच्याकडून दुरुस्ती मान्यता व त्याची नोंद होईपर्यन्त दुरुस्त केलेला उपविधी अंमलात आणता येणार नाही.

**62.** सभासद संस्थांस नोटीस दिली पाहिजे असे या उपविधीत जेथे नमूद केले असेल तेथे,सभासदांच्या दिलेल्या पत्त्यावर अशी नोटीस दिली म्हणजे त्या नोटीशीची योग्य बजावणी झाली असे समजले जाईल.

**63.** संस्थेचा शिक्का :- कलम 36 प्रमाणे संस्थेचा एक सामाईक शिक्का (सिल) असेल व तो व्यवस्थापकाच्या ताब्यात राहील व त्याचा वापर अध्यक्ष व संचालक मंडळाच्या ठरावाच्या अधिकारान्वये होईल.

--------------------------------